Library

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ग्लोबल टाइम्स

■ मराठी दैनिक


भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

www.theglobaltime.com ■ Register No. : RNI - MAHAMAR /2012/44621 ■ मुंबई ■ अंक : २९६ ■ वर्ष : ११

■ गुरुवार दि. २ नोव्हेंबर २०२३ ■ पाने : ०८ ■ किंमत : ₹ ३.००

# विवेकानंदमध्ये भरडधान्याला प्रोत्साहन देण्यासाठीच्या स्पर्धेत ६० विद्यार्थी सहभागी

*कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षामुळे जागतिक स्तरावर मुख्य घटक म्हणून भरडधान्याला प्रोत्साहन देण्यासाठी व नवीन पिढीमध्ये त्याची जागृती होण्यासाठी विवेकानंद कॉलेजमध्ये स्पर्धा आयोजित केली होती. यामध्ये ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विविध भरडधान्यांच्या पाककृती तयार करून आणल्या होत्या.*



02/11/2023

वनस्पतीशास्त्र विभाग, विवेकानंद कॉलेज येथे बुधवारी आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षानिमित्त, भारतीय भरड धान्याच्या विविध पाककृती स्पर्धा व भितीपत्रिका स्पर्धा यांचे आयोजन केले होते. या स्पर्धेसाठी वनस्पतीशास्त्र विभागातील बी.एस्सी.भाग १, २ व ३ यातील एकूण ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यासाठी विद्यार्थ्यांनी विविध भरडधान्यांच्या पाककृती जसे धावण, नाचणी करंजी, ज्वारीचे धपाटे, सॅलेड, आम्लेट, आंबील, राजगीरा हलवा, नाचणी लाडू, बिस्कीटे, इडली, आंबोळी, भाकरी, पापड, केक तयार करून आणले होते.

यावेळी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ. उर्मिला खोत, भौतिकशास्त्र विभागातील डॉ. सुमैया इनामदार व रसायनशास्त्र विभागातील डॉ. अस्मिता तपासे उपस्थित होत्या. यावेळी गणितशास्त्र विभाग प्रमुख प्रा. एस. पी. थोरात यांनी भरडधान्यांचे महत्त्व सांगितले.

वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी प्रास्ताविक केले. क्षितीज देसाई याने आभार मानले. संजना राठी व साक्षी पाटील या बी.एस्सी.भाग १ च्या विद्यार्थिनींनी सुत्रसंचालन केले. या कार्यक्रमासाठी वनस्पतीशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.